# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

वाचा- 1. या कार्यालयाचे आदेश जा.क्र.2020/डिसी-1/crpc-144/आदेश 113 दिनांक 02/05/2020.

2. या कार्यालयाचे आदेश जा. क्र. 2020/डिसी.-1/कोव्हीड-19, आदेश 115 दिनांक 02/05/2020.

3. या कार्यालयाचे आदेश जा. क्र. 2020/डिसी.-1/कोव्हीड-19, कृषी सेवा केंद्र व इतर आदेश 116 दिनांक 02/05/2020

4.या कार्यालयाचे आदेश जा. क्र. 2020/डिसी.-1/कोव्हीड-19, इलेक्ट्रीकल,व स्टेशनरी सा.दुकाने /आदेश 117 दिनांक 02/05/2020.

---

जा.क्र.2020/डिसी-1/crpc-144/कावी- 118 दिनांक 05.05.2020

**आदेश**

ज्याअर्थी, जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-19) हा विषाणू मूळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषित केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार भारतात, महाराष्ट्रातील शहरात गतीने पसरत आहे. असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोरोना विषाणू चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दि. 13.03.2020 रोजी पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदी नुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

तसेच करोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवू नये, तसेच सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, काही कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो या मुळे संदर्भीय 1 आदेशाअन्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये संपूर्ण जिल्हयामध्ये संचारबंदी लागु करण्यात आली आहे. तसेच उपरोक्त संदर्भिय 2 ते 4 चे आदेशान्वये जिवनावश्यक वस्तु व इतर (भाजीपाला व किराणा, इलेक्ट्रीकल व स्टेशनरी, कृषी सेवा केंद्र, इत्यादी ) सामान खरेदी करण्याकरीता एक दिवस आड या प्रमाणे वेळापत्रक निश्चीत करुन देण्यात आले होते. परंतु दिनांक 05/05/2020 रोजी हिंगोली शहरातील रिसाला बाजार परिसरात 1 रुग्ण करोना कोव्हीड-19 आयसोलेशन वार्ड मध्ये भर्ती करण्यात आला होता त्याचा थ्रोट स्वॅब अहवाल आज प्राप्त झाला असुन तो पॉझिटीव्ह आला आहे. त्यामुळे Containment plan मधील सुचनेनुसार उध्दभव असलेल्या ठिकाणापासुन 3 कि.मी. च्या परीसरातील सर्व प्रकारच्या हालचालीस (व्यक्ती, वाहन ) पुर्णत: बंदी करण्याचे माझे मत झाले आहे.

**त्याअर्थी मी, रुचेश जयवंशी , जिल्हा दंडाधिकारी हिंगोली** Containment plan मधील सुचनेनुसार रिसाला बाजार परिसर व अकोला बायपास- रोड उत्तर भाग अंतर 3 कि.मी, एनएच 161 बायपास – पुर्वेस भाग अंतर 3 कि.मी. , कयाधु नदी – दक्षिण भाग अंतर 3 कि.मी. , नांदेड बायपास - पश्चीम भाग अंतर 3 कि.मी. या परिसरात सर्व प्रकारच्या हालचालीस (व्यक्ती/वाहन) यास बंदी करीत आहे. तसेच हिंगोली मधील सदर ठिकाणच्या संपुर्ण सिमाबंद करण्यात येत असुन सदर सिमेमधुन कोणतेही वाहन अथवा व्यक्ती यांना आत किंवा बाहेर जाण्यास पुढील आदेशापर्यंत पुर्णत: प्रतिबंधीत करण्यात येत आहे.

संचारबंदी कालावधीमध्ये परवानगी घेतलेल्या व्यक्तीशिवाय इतर कोणतीही व्यक्ती रस्त्याने , बाजारमध्ये , गल्लींमध्ये, घराबाहेर फिरताना आढळुन आल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध असे समजण्यात येईल आणी पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

सदरील आदेशाची अंमलबजावणी करण्याची जवाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. हिंगोली , पोलीस अधिक्षक, हिंगोली, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, हिंगोली, सर्व उपविभागीय अधिकारी, हिंगोली , सहा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन परभणी , सर्व तहसिलदार , सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद, नगर पंचायत, ग्रामसेवक तलाठी इत्यादीची असेल.

**(रुचेश जयवंशी)**
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली**



Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

1. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी – आवश्यक कार्यवाहीस्तव**

1. पोलीस अधिक्षक हिंगोली
2. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली
3. उपविभागीय दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत
4. सहा.आयुक्त, अन्न व औषध प्रशासन परभणी यांना पुढील कार्यवाहीस्तव.
5. उपविभागीय पोलीसअधिकारी / पोलीस निरिक्षक सर्व यांना (मार्फत पोलीस अधिक्षक हिंगोली).
6. तालुका दंडाधिकारी हिंगोली/कळमनुरी/सेनगाव/वसमत/औंढा ना.
7. जिल्हा शल्य चिकीत्सक ,हिंगोली यांना माहितीस्तव.
8. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली.
9. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, हिंगोली.
10. उप प्रादेशीक परिवहन अधिकारी, हिंगोली.
11. जिल्हा माहीती अधिकारी हिंगोली यांना देवुन सुचित करण्यात येते की, वरील आदेश वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्यात यावा.
12. सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद, नगर पंचायत जि. हिंगोली यांना पुढील कार्यवाहीस्तव.
13. संबधीत तलाठी/ग्रामसेवक यांना अनुपालनास्तव.

स्वा/-
(रुचेश जयवंशी)
जिल्हादंडाधिकारी हिंगोली

Scanned by CamScanner